## रेव्ह पार्टीत पकडलं, आता खडसेंच्या जावयावर खळबळजनक आरोप!



| वर्ष - 8 | अंक - 349 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज™

www.mahaenews.com | सोमवार, दि. 28 जुलै 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत


- अष्टपैलू रविंद्र जडेजाचा दुर्मिळ विक्रम
- ...जमलं गिलने करून दाखवलं!
- ...तर तुमचं वैयक्तिक नुकसान होईल!
- आग्रा धर्मांतराचा पाकिस्तान संबंध


### अनेक लाभार्थी एकापेक्षा जास्त योजनांचा लाभ घेत असल्याचे, काही कुटुंबामध्ये दोन पेक्षा जास्त लाभार्थी असल्याचे स्पष्ट!

# लाडक्या बहिणीच्या पैशावर, चक्क लबाड भावांचा डल्ला!

### 'लाडकी बहीण योजने' ला घरघर : 26.34 लाख महिला अपात्र, जून महिन्यातील आकडेवारी जाहीर !

### शासनाची अचंबित करणारी आकडेवारी !

**महाराष्ट्रातील 'महायुती' सरकारची अतिशय महत्त्वाकांक्षी योजना म्हणून संपूर्ण देशात गाजलेल्या ' मुख्यमंत्री लाडकी बहीण योजने' ला घरघर लागली आहे की काय? असे वाटू लागले आहे. लाडक्या बहिणीच्या पैशावर चक्क लबाड भावांनी डल्ला मारल्याचेही काही ठिकाणी निष्पन्न झाले आहे.**



काही लाभार्थी एकापेक्षा जास्त योजनांचा लाभ घेत असल्याचे, काही कुटुंबामध्ये दोन पेक्षा जास्त लाभार्थी असल्याचे शासनाच्या आकडेवारीतून स्पष्ट झाले आहे. ही आकडेवारी सर्वांनाच अचंबित करणारी आहे. 'लाडकी बहीण योजने' साठी २६.३४लाख महिला अपात्र ठरल्या असून त्यांच्या खात्यावर पैसे नाहीत, असे जून महिन्यात जाहीर झालेल्या आकडेवारीवरून स्पष्ट उघडकीस आले आहे.

#### 26 लाखापेक्षा जास्त अपात्र..

राज्यातील 'महायुती' सरकारने जून महिन्यातील 'लाडकी बहीण योजने' च्या लाभार्थ्यांची तसेच अपात्र महिलांची संख्या पहिल्यांदाच जाहीर केली आहे. जून महिन्यात २.२५ कोटी पात्र लाडक्या बहिणींना त्यांच्या खात्यावर पैसे हस्तांतरित करण्यात आले आहेत. त्याचवेळी एकूण २६.३४ लाख महिलांना तात्पुरत्या स्वरुपात अपात्र करण्यात आल्याचे राज्य सरकारच्या प्रवक्त्याने म्हटले आहे.

#### पात्र महिलांनाच लाभ

जून महिन्यात सुमारे सव्वादोन कोटी पात्र लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांना लाभ मिळाला आहे. तर जून २०२५ पासून या २६.३४ लाख अर्जदारांचा लाभ तात्पुरत्या स्वरूपात स्थगित करण्यात आला आहे. यात काही लाभार्थी एकापेक्षा जास्त योजनांचा लाभ घेत असल्याचे तर काही कुटुंबामध्ये दोनपेक्षा जास्त लाभार्थी असल्याचे सिद्ध झाले आहे. काही ठिकाणी पुरुषांनी अर्ज केल्याच्या बाबी निदर्शनास आल्या आहेत. या पडताळणीनंतरच २६.३४ लाख अर्जदारांचा लाभ तात्पुरत्या स्वरूपात स्थगित करण्यात आला आहे.

#### काय म्हणाल्या अदिती तटकरे?

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने' अंतर्गत पात्र ठरलेल्या सर्व अर्जांची ओळख पटवण्यासाठी महिला आणि बालविकास विभागाने शासनाच्या सर्व विभागांकडून माहिती मागवली होती. यानुसार माहिती व तंत्रज्ञान विभागाने २६ लाखापेक्षा जास्त लाभार्थी अपात्र असताना देखील 'लाडकी बहीण योजने' चा लाभ घेत असल्याची माहिती सादर केली आहे.

### 'लाडकी बहीण योजने' ला घरघर!

महाराष्ट्रात धुमधडाक्यात सुरू असलेली लाडकी बहीण योजना ही चांगलीच अडचणीत सापडली आहे. या योजनेसाठी निधीची उपलब्धता व्हावी, म्हणून अर्थमंत्र्यांना महत्त्वपूर्ण निर्णय घ्यावे लागत आहेत. प्रसंगी अन्य विभागाच्या निधीला वर्ग करावे लागत आहे. लाडक्या बहिणी योजनेमुळे अन्य अनेक योजना बंद पडल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे.

#### सव्वा दोन कोटी लाडक्या बहिणींना निधी..

या माहितीच्या आधारे जून २०२५ पासून अशा प्रकारच्या अर्जदारांचा लाभ तात्पुरत्या स्वरूपात स्थगित करण्यात आला आहे. याव्यतिरिक्त पात्र असलेल्या सुमारे सव्वा दोन कोटी पात्र लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांना जून २०२५ महिन्याचा सन्माननिधी वितरित करण्यात आला आहे.

#### शहानिशा केल्यानंतर लाभ

तात्पुरत्या स्वरूपात लाभ स्थगित केलेल्या लाभार्थ्यांच्या माहितीची संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडून शहानिशा करून त्यापैकी जे लाभार्थी पात्र ठरतील त्यांचा लाभ शासनातर्फे पुन्हा सुरू करण्यात येईल, असे सरकारतर्फे सांगण्यात आले.

#### शासनाची दिशाभूल करणाऱ्यांचे काय?

शासनाची दिशाभूल करून चुकीच्या पद्धतीने लाभ घेणाऱ्या बनावट लाभार्थ्यांवर काय कारवाई करायची, याबाबत मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासोबत चर्चा करून योग्य निर्णय शासन स्तरावर घेण्यात येईल, असेही सांगण्यात आले.

#### लाडक्या बहिणींमुळे महायुतीला यश..

एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना महाराष्ट्रात 'लाडकी बहीण योजना' मोठ्या धुमधडाक्यात सुरू करण्यात आली. त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत याच लाडक्या बहिणींनी 'महायुती' सरकारला भरभरून मतदान केले आणि देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सरकार सत्तेवर आले.

# रस्त्यावर वाहन पार्क करताय सावधान!

## बेकायदेशीरपणे वाहने पार्क केल्याप्रकरणी पिंपरीत गुन्हा

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**दोन वाहने रस्ता दुभाजकाशेजारी बेकायदेशीरपणे पार्क करून रस्त्यावर येणाऱ्या-जाणाऱ्या लोकांना आणि वाहनांना अडथळा निर्माण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना शुक्रवार (२६ जुलै) रोजी दुपारी पिंपरी येथील भोला हॉटेलसमोरील के.एस.बी. चौक ते थरमॅक्स चौक या रोडवर घडली.**




या प्रकरणी पोलीस शिपाई अमोल बडक यांनी पिंपरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार वाहनचालका विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने त्याच्या ताब्यातील दोन वाहने के.एस. बी. चौक ते थरमॅक्स चौक या रोडवर रस्ता दुभाजकाशेजारी पार्क करून रस्त्यावर येणाऱ्या-जाणाऱ्या लोकांना व वाहनांना अडथळा निर्माण केला. वाहने रस्त्यावरून काढण्याबाबत पोलीस शिपाई अमोल बडक यांनी सांगितले असता, त्याने पोलिसांशी अरेरावीची भाषा वापरून "मी गाड्या काढत नाही, तुम्हाला काय करायचे आहे ते करून घ्या, तुम्हाला काय अधिकार आहे गाड्या काढण्याचा" असे बोलून अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करून पळून गेला. पिंपरी पोलीस तपास करत आहेत.बनावट शेअर मार्केट ॲप्लिकेशनद्वारे गुंतवणुकीचे आमिष दाखवून आणि वेगवेगळ्या बँक खात्यांमध्ये पैसे भरण्यास सांगून एक कोटी ७ लाख ३७ हजार ८८५ रुपयांची आर्थिक फसवणूक करण्यात आली.या प्रकरणी एका व्यक्तीने सायबर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

त्यानुसार दोन व्यक्ती तसेच नऊ बँक खाते धारक व ॲप्लिकेशन धारक व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादींना आरोपीने एका व्हॉट्सॲप समूहात समाविष्ट केले. त्यावर एक लिंक पाठवून त्याद्वारे फिर्यादींना एक बनावट शेअर मार्केट ॲप्लिकेशन डाउनलोड करण्यास सांगितले. व्हॉट्स अप ग्रुपचे ॲडमिन असलेल्या आरोपीने त्या ॲपद्वारे गुंतवणूक केल्यास चांगला नफा देण्याचे आमिष दाखवून शेअर ट्रेडिंगकरिता वेगवेगळ्या बँक खात्यांमध्ये गुंतवणूक करण्यास भाग पाडले. एकूण चार कोटी इतका आभासी परतावा आरोपींनी फिर्यादीला दाखवला. तसेच फिर्यादींना त्यांची रक्कम काढण्याकरिता वेगवेगळे सर्व्हिस चार्ज, सर्व्हिस टॅक्स भरण्यास सांगितले. यामध्ये आरोपींनी एकूण एक कोटी ७ लाख ३७ हजार ८८५ रुपये रक्कम भरण्यास भाग पाडून ते पैसे परत न देता त्यांची आर्थिक फसवणूक केली. सायबर पोलीस तपास करत आहेत.

### महामार्गावर अपघातात एकाचा मृत्यू

मुंबई-बंगळुरू महामार्गावर पुनावळे येथे वाहनाने धडक दिल्याने दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला. सतीश चंद्रशेखर निघोजकर (वय ४३, तळेगाव दाभाडे, मावळ) असे मृत्यू झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. या प्रकरणी उदय मधुसूदन देशमुख (४३, घोडबंदर रोड, मुंबई) यांनी रावेत पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार अज्ञात वाहन चालकाच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, देशमुख यांचे मेहुणे निघोजकर हे त्यांच्या दुचाकीरून कामावरून घरी जात होते. पुनावळे येथे पवना नदी पुलावर एका अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या निघोजकर यांचा मृत्यू झाला. आरोपी वाहन चालक अपघाताची माहिती न देता निघून गेला.

# गणेशोत्सवापूर्वी नारळाला उच्चांकी 'भाव'

## किरकोळ बाजारात प्रतिनग किंमत 40 ते 50 रुपये

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**दक्षिणेकडील राज्यांत नारळाच्या उत्पादनात २५ टक्क्यांनी घट झाल्याने यंदा गणेशोत्सवापूर्वी नारळाला उच्चांकी 'भाव' मिळाला आहे. किरकोळ बाजारात नारळाची किंमत ४० ते ५० रुपये झाली आहे.**




श्रावण महिन्यातील विविध सणांमुळे नारळांना मागणी वाढली आहे. गणेशोत्सवातही नारळाला मोठ्या प्रमाणात मागणी असते. दक्षिणेकडील कर्नाटक, आंध्र प्रदेश, केरळ, तमिळनाडू या राज्यांत पाऊस कमी प्रमाणात झाला. त्यामुळे उत्पादनात घट झाली. तसेच नारळाच्या झाडांना मोठ्या प्रमाणात कीड लागली. त्यामुळे घाऊक बाजारात नारळाची आवक कमी प्रमाणावर होत आहे. त्यामुळे दरवाढ झाली आहे.'मार्केट यार्डातील भुसार बाजारात दररोज दोन ते अडीच लाख नारळांची आवक होत आहे.

एका पोत्यात १०० नारळ असतात. नेहमीच्या तुलनेत यंदा नारळांची आवक कमी प्रमाणावर होत आहे,' असे मार्केट यार्डातील नारळ व्यापारी दीपक बोरा यांनी सांगितले.'गणेशोत्सव, नवरात्रोत्सवात नारळांना मागणी असते. उत्सवात मंदिरात तोरण, उपवासाचे खाद्यपदार्थ तयार करण्यासाठी नारळाची मागणी वाढते. खोबरेल तेल आणि गोटा खोबऱ्याला मागणी चांगली आहे. पुणे शहरासह पश्चिम महाराष्ट्रातील व्यापारी मार्केट यार्डामधून नारळाची खरेदी करतात. उत्सवाच्या कालावधीत खाद्यपदार्थ विक्रीत मोठी वाढ होते. हॉटेल-केटरिंग व्यावसायिक, तसेच खाद्यपदार्थ विक्रेत्यांकडून नारळांच्या मागणीत वाढ होते,' असे बोरा यांनी नमूद केले. श्रावण महिना सुरू झाल्यानंतर नारळाच्या मागणीत वाढ होते. गणेशोत्सवात नारळाला उच्चांकी मागणी असते. यंदा दक्षिणकेडील राज्यांत नारळ उत्पादनात २५ टक्क्यांनी घट झाली आहे. गणेशोत्सवापूर्वीच नारळाला उच्चांकी भाव मिळाला आहे. नारळाचा भाव तेजीत राहणार आहे.श्रावण महिन्यातील विविध सणांमुळे नारळांना मागणी वाढली आहे. गणेशोत्सवातही नारळाला मोठ्या प्रमाणात मागणी असते. दक्षिणेकडील कर्नाटक, आंध्र प्रदेश, केरळ, तमिळनाडू या राज्यांत पाऊस कमी प्रमाणात झाला. त्यामुळे उत्पादनात घट झाली. तसेच नारळाच्या झाडांना मोठ्या प्रमाणात कीड लागली. त्यामुळे घाऊक बाजारात नारळाची आवक कमी प्रमाणावर होत आहे. त्यामुळे दरवाढ झाली आहे.'मार्केट यार्डातील भुसार बाजारात दररोज दोन ते अडीच लाख नारळांची आवक होत आहे. एका पोत्यात १०० नारळ असतात. नेहमीच्या तुलनेत यंदा नारळांची आवक कमी प्रमाणावर होत आहे,' असे मार्केट यार्डातील नारळ व्यापारी दीपक बोरा यांनी सांगितले.'गणेशोत्सव, नवरात्रोत्सवात नारळांना मागणी असते.

### नारळांच्या मागणीत वाढ

उपवासाचे खाद्यपदार्थ तयार करण्यासाठी नारळाची मागणी वाढते. खोबरेल तेल आणि गोटा खोबऱ्याला मागणी चांगली आहे. पुणे शहरासह पश्चिम महाराष्ट्रातील व्यापारी मार्केट यार्डामधून नारळाची खरेदी करतात. उत्सवाच्या कालावधीत खाद्यपदार्थ विक्रीत मोठी वाढ होते. हॉटेल-केटरिंग व्यावसायिक, तसेच खाद्यपदार्थ विक्रेत्यांकडून नारळांच्या मागणीत वाढ होते,' असे बोरा यांनी नमूद केले.

## वाकडला सोसायटीधारकांचा

# दफनभूमीच्या आरक्षणाला विरोध!

### रहिवाशांच्या हजारो हरकती; आरक्षण रद्द करण्याची मागणी

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**वाकड येथील रहिवाशांनी दफनभूमीच्या आरक्षणाविरोधात हजारो हरकत घेतल्या आहेत. अतिशय दाट लोकवस्ती आणि मुळा नदीच्या काठावरील नदी सुधार प्रकल्पामुळे हा परिसर दफनभूमीसाठी योग्य नसल्याचे रहिवाशांचे म्हणणे आहे. या आरक्षणामुळे नागरिकांच्या जीवनावर, मालमत्तेवर होणाऱ्या विपरीत परिणामांचा विचार करून हे आरक्षण तत्काळ रद्द करावे, महापालिकेने स्थानिकांच्या भावना आणि कायदेशीर बाबींचा विचार करून पर्यायी जागेचा विचार करावा, अशी विनंती स्थानिकांनी केली आहे.**



सोसायटींच्या वतीने कॅस्केड सोसायटीचे लक्ष्मण क्षीरसागर, पद्मावती धाराचे नितीन शिंदे, व्हिसलिंग पामचे ललितेंद्र गांधी, निसर्ग पूजाचे अतुल मानकर यांच्या शिष्टमंडळाने आमदार शंकर जगताप यांना निवेदन दिले आहे. महापालिकेच्या प्रारूप विकास आराखड्यात वाकड येथील सर्व्हे नं. २५८ आणि २६१ मध्ये सुमारे अडीच एकरावर 'दफनभूमीचे आरक्षण' प्रस्तावित आहे. या आरक्षणाला स्थानिक तसेच सोसायटी रहिवाशांनी तीव्र विरोध केला आहे.

या परिसरात मोठ्या सोसायट्या आहेत. त्यामुळे येथे दफनभूमीला आमचा प्रखर विरोध आहे. या परिसरात रहिवाशांची मोठी वर्दळ असून दफनभूमी झाल्यास सामाजिक स्वास्थ बिघडण्याची शक्यता आहे. परिसरात दाट लोकवस्ती आणि मुळा नदी सुधार प्रकल्पामुळे हा परिसर दफनभूमीसाठी योग्य नाही. जीवनमानावर आणि मालमत्तेवर होणाऱ्या नकारात्मक परिणामांचा विचार करून ते तत्काळ रद्द करावे. असे येथील रहिवासीयांनी हरकतीमध्ये म्हटले आहे.

#### रहिवाशांच्या प्रमुख हरकती

मुळा नदीजवळ दफनभूमी उभारल्यास नदीचे पाणी आणि परिसरातील जीवसृष्टीला हानी पोहोचेल. दफनभूमीमुळे दुर्गंधी, आरोग्य समस्या आणि लहान मुलांवर विपरीत परिणाम होण्याची भीती आहे. रहिवाशांच्या मानसिक आरोग्यावर परिणाम होईल. कायदेशीर नियमांचे उल्लंघन करून रहिवाशांच्या आरोग्य सुरक्षेचा विचार न करताच निर्णय घेतल्याचे सांगत हे आरक्षण रद्द करण्याची आग्रही मागणी स्थानिकांनी केली आहे.

---

## अखेर नवीन बंधाऱ्याच्या कामासाठी मंजुरी!

### पवना नदीवरील ब्रिटिशकालीन रावेत बंधारा पाडणार; बंधाऱ्यातील साठवण क्षमता वाढणार

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पवना नदीवरील ब्रिटीशकालीन रावेत बंधारा पाडून नवीन बंधाऱ्याच्या कामासाठी अखेर मंजुरी मिळाली असून जलसंपदा विभागाकडून हे काम केले जाणार आहे. त्यामध्ये बंधाऱ्यातील साठवण क्षमता वाढण्याची अपेक्षा आहे. नवीन बंधाऱ्यासाठी चार प्रकारची रेखाचित्रे (डिझाईन) विभागाला प्राप्त झाली आहेत.**



रावेत येथील जुना बंधारा ब्रिटीशांकडून १९२५ ते १९३० मध्ये बांधण्यात आला होता. त्याला आता शंभर वर्षांहून अधिक वर्षे झाली असून सध्या जीर्णावस्थेत आहे. हा बंधारा गाळाने भरल्याने तसेच गुरुत्वाकर्षणातील अडथळ्यामुळे दररोज सुमारे पाच कोटी लिटर पाणी वाया जात आहे. बंधारा काही ठिकाणी फुटल्याने पावसाळ्यात काही वेळा वस्त्यांमध्ये पाणी शिरण्याचा धोका निर्माण होतो. त्यामुळे या बंधाऱ्याचे स्ट्रक्चरल ऑडिट करून बंधाऱ्याचे काम हाती घ्यावे, अशी मागणी करण्यात आली होती. त्याची दखल घेत जलसंपदा विभागाने तातडीने पंचनामे करून अहवाल सादर केला होता.

दरम्यान सध्याचा बंधारा दुरुस्ती पलीकडे आहे. त्यामुळे महापालिकेने नवीन आणि थोडा जास्त उंचीचा म्हणजे साडेचार मीटर उंचीचा बंधारा बांधल्यास त्यांचा पाणीसाठा वाढेल. तसेच नदीच्या सध्याच्या पात्राचा वापर करता येईल.

आणखी भूसंपादनाची आवश्यकता नाही. हे महापालिकेने स्वतः करावे किंवा जलसंपदा खात्याकडून करून घ्यावे, त्याचा निर्णय महापालिकेने घ्यावा, असे नागरिकांकडून सुचविले जात आहे.

#### खर्च समसमान विभागणार

नवीन बंधाऱ्यासाठी जलसंपदा विभाग, राज्य औद्योगिक विकास महामंडळ आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्यात समन्वयाने निर्णय घेतला जात आहे. सुमारे ४.५ मीटर उंचीचा व २१६ मीटर लांबीचा बंधारा बांधण्यात येणार आहे. त्यासाठीचा खर्च वरील सर्व संस्थांकडून करण्यात येणार असल्याची माहिती आहे.

> रावेत येथील नवीन बंधाऱ्याच्या कामासाठी जलसंपदा विभागातर्फे प्रक्रिया सुरू आहे. यासाठी वेगवेगळ्या डिझाईन्स मागविण्यात आल्या होत्या. त्यामध्ये चार डिझाईन प्राप्त झाल्या आहेत. यापैकी योग्य डिझाईन निश्चित करून पुढील प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल.-
>
> -**संकेत पतंगे,** सहाय्यक अभियंता, जलसंपदा विभाग




# चिप-चरित्र : शीतयुद्धाचे लाभार्थी

**पन्नासच्या दशकाच्या अंतापर्यंत सेमीकंडक्टर चिप क्षेत्र जरी बाल्यावस्थेतच असलं तरीही त्यात बरीच उलथापालथ झाली होती. बेल लॅब्सने 'ट्रान्झिस्टर'चा शोध लावला होता. विविध ट्रान्झिस्टर्सचं एकत्रीकरण करून किल्बी आणि नॉईस यांनी समांतरपणे 'इंटिग्रेटेड सर्किट'ची (आयसी) निर्मिती केली होती.**

एका बाजूला टेक्सास इन्स्ट्रुमेंट्स तर दुसऱ्या बाजूला नॉईस आणि सहकाऱ्यांनी स्थापन केलेली फेअरचाइल्ड सेमीकंडक्टर या दोन्ही अमेरिकी कंपन्या चिपनिर्मितीच्या अभियांत्रिकी प्रक्रियेत गुंतल्या होत्या. निर्वात नलिकेपेक्षा सेमीकंडक्टर चिप ही कार्यक्षमता, सुटसुटीतपणा, देखभाल, टिकाऊपणा अशा सर्वच मानकांवर किती तरी पटीने श्रेष्ठ उत्पादन आहे याबाबतीत कोणाचंच दुमत नसलं तरीही चिप उद्योगाच्या वेगवान वाटचालीसाठी महत्त्वाच्या असलेल्या दोन गोष्टी अजूनही अनुत्तरितच होत्या. चिपचं किफायतशीर पद्धतीनं मोठया प्रमाणावर उत्पादन कसं करायचं हा पहिला प्रश्न! चिपनिर्मितीचा खर्च एवढा अवाढव्य होता की कमी प्रमाणात चिपचं उत्पादन हा आतबट्टयाचा व्यवहार ठरला असता आणि असं असताना कोणतीही कंपनी अशा धंद्यात उतरणं आणि उतरली तरी फार काळपर्यंत टिकणं कठीणच होतं. अमेरिकी शासनाचा नवउद्यमींना



पाठिबा असला तरीही एकंदरच अमेरिकेचा भांडवलशाहीवर दृढ विश्वास असल्यानं सरकारी अनुदान, करकपात अशा पद्धतीची शासकीय मदत मिळण्याची शक्यता दुरापास्त होती. अशा वेळेला चिपचं उत्पादन सातत्यपूर्ण आणि मोठया प्रमाणात करण्याशिवाय पर्याय नव्हता.दुसऱ्या बाजूला जरी प्रचंड संख्येनं चिपचं उत्पादन केलं गेलं तरी अशा मोठया प्रमाणावर निर्मिल्या गेलेल्या चिपची खरेदी कोण करणार हा यापुढचा प्रश्न. सेमीकंडक्टर पदार्थामागील भौतिकी विज्ञानच एवढं नवं होतं की त्यापासून बनलेल्या चिपचा योग्य वापर करण्यासाठी कोणतंही उत्पादन बाजारात उपलब्ध नव्हतं. आणि अर्थशास्त्राच्या नियमानुसार जर एखाद्या पदार्थाला विशेष मागणीच नसेल तर त्याचं उत्पादन, वितरण आणि पुरवठा करण्यासाठी कोणतीही संस्था किंवा कंपनी तयार होण्याची शक्यताच नव्हती. म्हणजेच या क्षेत्रापुढचे हे दोनही यक्षप्रश्न कोंबडी आधी की अंडं या प्रश्नासारखे एकमेकांत गुंतलेले होते. पन्नासच्या दशकाच्या अंतापर्यंत अमेरिकेत चिप उद्योग अनिश्चिततेच्या गर्तेत अडकला होता. सेमीकंडक्टर विज्ञान पुढे जात होतं पण चिपचा योग्य वापर नक्की कशासाठी करायचा हे पुरेसं स्पष्ट होत नव्हतं. अशा वेळेला अत्यंत अनपेक्षितपणे अमेरिका व रशिया या तत्कालीन महासत्तांमध्ये सुरू असलेलं शीतयुद्ध चिप उद्योगाच्या मदतीला धावून आलं. ४ ऑक्टोबर १९५७ रोजी सोव्हिएत रशियाने आपला 'स्पुटनिक' हा उपग्रह यशस्वीपणे प्रक्षेपित केला. तशी १८००० मैल अशा प्रचंड वेगानं पृथ्वीप्रदक्षिणा करणाऱ्या या लहानशा उपकरणानं अमेरिकी शासन, लष्कर व अमेरिकेची अंतराळ विज्ञान संस्था 'नासा' या सर्वांचीच झोप उडवली. हा उपग्रह रशियानं आपल्यावर पाळत ठेवण्यासाठी बनवला आहे याची अमेरिकी सरकार व समाज या दोघांनाही खात्री पटू लागली. चारच वर्षांनी, १२ एप्रिल १९६१ रोजी रशियानं अंतराळक्षेत्रात आणखी एक शिखर पादाक्रांत केलं; जेव्हा रशियन अंतराळवीर युरी गागारिन यानं पृथ्वीभोवती एक प्रदक्षिणा पूर्ण करून अंतराळात जाणारा पहिला मानव म्हणून नाव मिळवलं. तंत्रज्ञानात आपण रशियाच्या लक्षणीयरीत्या मागे पडत आहोत याची जाणीव अमेरिकी नेतृत्वाला प्रकर्षाने व्हायला लागली. रशियावर कुरघोडी करण्यासाठी आणि अमेरिकी प्रसारमाध्यमं व समाजाकडून होणाऱ्या टीकेला प्रत्युत्तर म्हणून यानंतर वर्षभरातच १९६२ साली अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष जॉन केनेडींनी, साठचे दशक संपायच्या आतच अमेरिकी माणूस चंद्रावर पाऊल ठेवेल अशी घोषणा केली. तर नासाने या घोषणेच्या अंमलबजावणीसाठी 'अपोलो मिशन'ची सुरुवात केली. पण पृथ्वीवरून अंतराळवीरांना घेऊन चंद्र गाठण्यासाठी अंतराळयानाला अत्यंत जटिल अशी गणितीय प्रारूपं व समीकरणं प्रचंड मोठया संख्येनं सोडवायला लागणार होती. इतकी गणनक्षमता असणारं तंत्रज्ञान नासाकडे निश्चितच उपलब्ध नव्हतं.

## संपादकीय »

### 'अंक' माझा वेगळा?


***लोकसंख्या-नियंत्रण करून, प्रगती साधून देशाच्या महसूलवाढीस हातभार लावणाऱ्या राज्यांच्या मागण्यांकडे विभाजनवादी नजरेतून पाहणे अयोग्यच..***

कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांस राज्यासाठी केंद्राकडून अधिक महसूल-वाटा हवा आहे. तशी मागणी करण्यासाठी ते दिल्लीत धडकले तर त्याची संभावना अर्थमंत्र्यांनी खोटारडे अशी केली आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सिद्धरामय्या यांच्या पक्षावर उत्तर-दक्षिण भेदभाव निर्माण करीत असल्याचा आरोप केला. पंतप्रधान म्हणून मोदी यांच्या भूमिकेविषयी सहानुभूती. याचे कारण गुजरातच्या मुख्यमंत्रीपदी असताना नरेंद्र मोदी यांनी केंद्राविषयी असाच एल्गार वारंवार केला होता आणि केंद्र हे गुजरातवर अन्याय करते असे त्यांचे तेव्हा म्हणणे होते. तेव्हा अहमदाबादेतून दिसणारा भारत हा दिल्लीतून दिसणाऱ्या भारतापेक्षा वेगळा असू शकतो हे आपण लक्षात घ्यायला हवे. त्यामुळे मुख्यमंत्रीपदी असतानाची भूमिका पंतप्रधानपदी गेल्यावर बदलू शकते हे सत्यही लक्षात येईल.

**डिसेंबर १९४६ मध्ये संविधान सभा स्थापन झाली. समित्या, उपसमित्या नेमल्या गेल्या. कामांचे वाटप झाले. १३ डिसेंबर १९४६ रोजी भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी संविधान सभेत उद्देशिकेचा ठराव मांडला. नेहरूंनी हा ठराव मांडताच पुरुषोत्तम दास टंडन यांनी त्यास अनुमोदन दिले.**

## संविधानभान : संविधानाची प्राणप्रतिष्ठा

पूर्ण स्वराज्याच्या ठरावाच्या वेळी पं. नेहरू यांनी मसुदा तयार केला होता. तेव्हापासून स्वतंत्र भारताचे संकल्पचित्र त्यांच्या मनाच्या तळाशी होते. त्यानुसार नेहरूंनी या उद्देशिकेच्या ठरावाची मांडणी केली होती. हा उद्देशिकेचा ठराव म्हणजे भारतीय गणराज्याचे तात्त्विक अधिष्ठान होय. हा ठराव एखाद्या प्रतिज्ञेप्रमाणे किंवा शपथेसारखा आहे. भारताचा प्रत्येक नागरिक ही शपथ घेत आहे, घेणार आहे, हे डोळयासमोर ठेवून संविधान सभा ही शपथ स्वीकारत असल्याचे सूतोवाच या प्रतिज्ञेत आहे. या उद्देशिकेच्या ठरावात भारत हे स्वतंत्र, सार्वभौम गणराज्य असेल, असे म्हटले होते. यादिवशी मुस्लीम लीगचे आणि संस्थानांचे प्रतिनिधी गैरहजर होते, मात्र नेहरू म्हणाले : त्या सर्वांचा समावेश असणारे गणराज्य अस्तित्वात आणण्याचा आपला प्रयत्न असेल. या गणराज्याची अंतिम सत्ता लोकांकडे असेल. सामाजिक, आर्थिक, राजकीय



न्याय, विचार व अभिव्यक्तिस्वातंत्र्य, श्रद्धेचे स्वातंत्र्य आदी मूल्यांवर आधारित असे हे गणराज्य असेल. अल्पसंख्य, मागास जाती आणि आदिवासी क्षेत्रे यांना न्याय देईल, असे मूलभूत न्यायाचे तत्त्वही नेहरूंनी अधोरेखित केले.बारकाईने वाचले तर लक्षात येईल की भारतीय संविधानाची उद्देशिका हे एक दीर्घ वाक्य आहे. नानी पालखीवाला म्हणाले होते, "संविधानाची उद्देशिका हे संविधानाचे ओळखपत्र आहे." संविधानाचे ओळखपत्र म्हणजे पर्यायाने भारतीयांचे आयकार्ड. ही ओळख आपण काय विचार करतो आहोत, यानुसार सांगितले आहे आणि आपले सामूहिक स्वप्न काय आहे, याचा निर्देश केला आहे. त्यामुळे आपला विचार आणि आपली भविष्यातील दिशा या दोन्ही दृष्टीने उद्देशिकेचे महत्त्व आहे.

मौलाना हसरत मोहानी, एच व्ही कामत, दाक्षायनी वेलायुधन, के एम मुन्शी, पूर्णिमा बॅनर्जी, रोहिणी चौधरी यांसारख्या सदस्यांनी उद्देशिकेच्या ठरावावरील चर्चेत सक्रिय सहभाग घेतला. बाबासाहेब आंबेडकरांनी याच ठरावाच्या अनुषंगाने संविधान सभेत दिलेले भाषण गाजले. या ठरावातील एकेका उताऱ्यावर बाबासाहेबांनी त्यांची मते मांडली.

संघराज्याच्या प्रारूपाविषयी बरेच मतभेद संविधान सभेतल्या सदस्यांमध्ये होते. प्रांतांच्या रचनेचा मुद्दाही या ठरावाच्या चर्चेदरम्यान आला. डिसेंबर १९४६ आणि जानेवारी १९४७ मध्ये या ठरावावर बरीच उलटसुलट चर्चा झाली. ही चर्चा सविस्तर होणे जरुरीचे होते कारण हा संविधानाचा प्राण होता.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# शिंदेंच्या मंत्र्यांना बदनाम करण्याचा कट!

## अनिल परबांनी कदम यांच्यावर काय आरोप केले

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**गेल्या काही दिवसांपासून राज्याच्या राजकारणात अनेक घडामोडी घडत असल्याचं पाहायला मिळत आहे. काही दिवसांपूर्वीच विधीमंडळाचं पावसाळी अधिवेशन पार पडलं. या अधिवेशनादरम्यान शिवसेना (शिंदे) पक्षाच्या काही मंत्र्यांवर गंभीर आरोप करण्यात आले होते. त्यामुळे चांगलंच राजकारण तापलं होतं. मंत्री योगेश कदम यांच्यावर सावली बारच्या मुद्द्यावरून ठाकरे गटाचे नेते अनिल परब यांनी आरोप केले होते. एवढंच नाही तर मंत्री योगेश कदम यांच्या राजीनाम्याची मागणीही परब यांनी केली होती.**





तसेच अधिवेशनाच्या दरम्यान मंत्री संजय शिरसाट यांचा पैशांनी भरलेली बॅगेसह एक व्हिडीओ समोर आला होता. त्यावरूनही विरोधकांनी सरकारवर जोरदार टीका केली होती. तसेच अधिवेशनाच्या दरम्यान आमदार संजय गायकवाड यांनी आमदार निवासातील कॅन्टीन कर्मचाऱ्याला मारहाण केल्याचं प्रकरणही चांगलंच चर्चेत आलं होतं. दरम्यान, या सर्व घडामोडींच्या अनुषंगाने बोलताना आता शिवसेनेचे नेते ज्येष्ठ नेते रामदास कदम यांनी एक मोठं विधान केलं आहे. 'शिंदेंच्याच मंत्र्यांना बदनाम करण्याचं कट कारस्थान रचलं जातयं का?' असा संशय असल्याचं रामदास कदम आज एका कार्यक्रमात बोलताना म्हटलं आहे."शिंदे साहेब आपल्याला याच्या खोलपर्यंत जावं लागेल. मला एक संशय असा आहे की उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मंत्र्यांनाच बदनाम करण्याचं कट कारस्थान रचलं जातयं का? असा संशय माझ्या मनात आहे", असं रामदास कदम यांनी म्हटलं आहे. त्यांच्या या विधानामुळे चर्चांना उधाण आलं आहे.शिवसेना (ठाकरे) आमदार अनिल परब यांनी गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्यावर गंभीर आरोप केला होता. योगेश कदम यांच्या आई ज्योती कदम यांच्या नावे कांदिवलीत सावली नावाचा डान्सबार आहे. पोलिसांनी अलीकडेच या बारवर धाड टाकून २२ बारबालांना ताब्यात घेतलं होतं. "महाराष्ट्रात डान्सबारवर बंदी असतानाही हा बार कसा सुरू आहे?" असा प्रश्न देखील अनिल परब यांनी उपस्थित केला होता. तसेच त्यांनी योगेश कदम यांच्यावर कारवाई करण्याची, त्यांचा राजीनामा घेण्याची मागणी केली होती. शिवसेनेचे (ठाकरे) नेते संजय राऊत यांनी एक्स अकाऊंटवर एक व्हिडीओ शेअर करत खळबळ उडवून दिली होती. या व्हिडीओमध्ये सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट आपल्या बेडरूममध्ये बसलेले दिसत होते. तसेच त्यांच्या शेजारी एक पैशांनी भरलेली बॅग दिसली होती. संजय राऊत यांनी व्हिडीओ समोर आणल्यानंतर एकच खळबळ उडाली होती. त्यानंतर संजय शिरसाटांनी स्पष्टीकरण देताना म्हटलं होतं की, "व्हायरल व्हिडीओत दिसणाऱ्या बॅगेत कपडे आहेत. मात्र ते पैसे असल्याचे सांगितले जात आहे. कुणीतरी जाणीवपूर्वक असे व्हिडीओ व्हायरल करत आहे. मात्र अशी बदनामी केली तरी त्याचा आमच्या कारकिर्दीवर त्याचा काहीही परिणाम होणार नाही."तसेच अधिवेशनाच्या दरम्यान मंत्री संजय शिरसाट यांचा पैशांनी भरलेली बॅगेसह एक व्हिडीओ समोर आला होता. त्यावरूनही विरोधकांनी सरकारवर जोरदार टीका केली होती. तसेच अधिवेशनाच्या दरम्यान आमदार संजय गायकवाड यांनी आमदार निवासातील कॅन्टीन कर्मचाऱ्याला मारहाण केल्याचं प्रकरणही चांगलंच चर्चेत आलं होतं. दरम्यान, या सर्व घडामोडींच्या अनुषंगाने बोलताना आता शिवसेनेचे नेते ज्येष्ठ नेते रामदास कदम यांनी एक मोठं विधान केलं आहे.

### रामदास कदम काय म्हणाले?

'शिंदेंच्याच मंत्र्यांना बदनाम करण्याचं कट कारस्थान रचलं जातयं का?' असा संशय असल्याचं रामदास कदम आज एका कार्यक्रमात बोलताना म्हटलं आहे."शिंदे साहेब आपल्याला याच्या खोलपर्यंत जावं लागेल. मला एक संशय असा आहे की उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मंत्र्यांनाच बदनाम करण्याचं कट कारस्थान रचलं जातयं का? असा संशय माझ्या मनात आहे", असं रामदास कदम यांनी म्हटलं आहे. त्यांच्या या विधानामुळे चर्चांना उधाण आलं आहे. शिवसेना (ठाकरे) आमदार अनिल परब यांनी गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्यावर गंभीर आरोप केला होता. योगेश कदम यांच्या आई ज्योती कदम यांच्या नावे कांदिवलीत सावली नावाचा डान्सबार आहे. पोलिसांनी अलीकडेच या बारवर धाड टाकून २२ बारबालांना ताब्यात घेतलं होतं.

# बोर्डीकर-भांबळेंमधील पारंपरिक संघर्ष!

## भांबळे यांनी या प्रकरणी बोर्डीकर यांच्या राजीनाम्याची मागणी केली

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांचे नाव असलेला टेम्पो पुसद येथे पोलिसांनी पकडल्यानंतर त्यावर आता जिल्ह्यात राजकारण सुरू झाले आहे. नुकतेच अजित पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केलेले माजी आमदार विजय भांबळे यांनी या प्रकरणी बोर्डीकर यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. या टेम्पोच्या माध्यमातून पुण्याहून नागपूरला अधिकृत खरेदीदाराकडे विदेशी दारूचा साठा नेला जात होता.**




मात्र, ही दारू बनावट असल्याचा आरोपही भांबळे यांनी केला आहे. यावर भांबळे यांच्या आरोपाला भाजपच्या जिल्हाध्यक्षांनी उत्तर दिले असून, या निमित्ताने मित्रपक्षात आल्यानंतरही बोर्डीकर-भांबळे यांच्यातील संघर्ष पुन्हा सुरू झाल्याचे दिसून येत आहे. आपल्या नातेवाईकाचे पुण्यात ट्रान्सपोर्ट आहे, त्यांच्याकडे अनेक वाहने आहेत. अनेक कंपन्यांच्या वाहतुकीची कंत्राटे त्यांच्याकडे आहेत. नातेवाईकाच्या ट्रान्सपोर्टमधीलच एका टेम्पोमधून अधिकृत असा विदेशी दारूचा साठा नागपूरला अधिकृत खरेदीदाराकडे जात होता. त्या टेम्पोला जीपीएस यंत्रणा होती. हा टेम्पो नातेवाईकांना नागपूर ऐवजी अन्यत्र जात असल्याचा संशय आला तेव्हा लगेचच पुसद येथील मित्रांकरवी नातेवाईकांनी पोलिसांच्या मदतीने हे वाहन शोधले, तेव्हा ट्रकचालकाचा गैर हेतू लक्षात आला, असे पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांनी स्पष्ट केले आहे. याप्रकरणी पोलिसांनी रीतसर खुलासा केल्याचेही त्यांनी सांगितले.पोलिसांच्या स्पष्टीकरणानंतरही भांबळे यांनी या प्रकरणात पालकमंत्री बोर्डीकर यांच्यावर आरोप केले आहेत. हा विदेशी दारूचा साठा बनावट असून, तसेच पालकमंत्र्यांच्या आशीर्वादाने जिंतूर तालुक्यात गुटखा, वाळू यासारखे धंदे चालत असून, त्यांनी राजीनामा द्यावा.

### काय आहे मूळ प्रकरण ?

, अशी मागणी भांबळे यांनी केली आहे. भाजपच्या जिल्हाध्यक्षांनी भांबळे यांना उत्तर दिले आहे. नैतिकतेच्या गोष्टी आमच्या समोर करू नयेत. जनतेची दिशाभूल करून धूळफेक करत आमच्या नेतृत्वावर चिखलफेक करण्याचा प्रयत्न केला तर आम्ही सुद्धा त्याच भाषेत उत्तर देऊ. युतीचे मित्रपक्ष आहात तर मित्रपक्षासारखे वागा, अन्यथा भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते प्रत्युत्तर देतील, अशी प्रतिक्रिया भाजपचे जिल्हाध्यक्ष सुरेश भुमरे यांनी दिली आहे. काल – परवा तुमच्या पक्षात आलेल्यांनी आमच्या नेतृत्वावर टीका केली तर आम्ही गप्प बसणार नाही. तुम्ही तुमच्या कार्यकर्त्याला समज द्या, असेही भुमरे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना उद्देशून म्हणाले आहेत.जिंतूर विधानसभा मतदारसंघात गेल्या तीन दशकांपासून बोर्डीकर विरुद्ध भांबळे असा टोकाचा संघर्ष आहे. काही दिवसांपूर्वीच भांबळे यांनी शरद पवारांच्या राष्ट्रवादीतून अजित पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केला.

# ...तर तुमचं वैयक्तिक नुकसान होईल!

## इस्रायल काट्झ यांनी अयातुल्ला खोमेनी यांना इशारा दिला

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**इस्रायल आणि इराण यांच्यातील संघर्ष सध्या निवाळल्याचं पाहायला मिळत आहे. इस्रायल -इराणच्या संघर्षात अमेरिकेनेही उडी घेतली होती. अमेरिकेने इराणमधील आण्विक तळांवर हल्ला केला होता, त्यानंतर इराणने कतारमधील अमेरिकेच्या हवाई तळांवर हल्ला केला होता. दरम्यान, त्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांनी इस्रायल आणि इराण या दोन्ही देशांमध्ये युद्धबंदी घोषणा केली होती. दरम्यान, युद्धबंदीच्या घोषणेनंतर इस्रायल-इराणमध्ये सध्या तरी तणावपूर्ण शांतता आहे.**



असं असतानाच आता इस्रायल- इराणबाबत महत्वाची माहिती समोर आली आहे. इस्रायलचे संरक्षण मंत्री इस्रायल काट्झ यांनी इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खोमेनी यांना रविवारी मोठा इशारा दिला आहे. 'जर अयातुल्ला अली खोमेनी ज्यू राष्ट्राला धमकावत राहिले तर त्यांचं वैयक्तिक नुकसान होईल', असं इस्रायल काट्झ यांनी म्हटलं आहे. त्यांच्या या इशाऱ्यामुळे पुन्हा इस्रायल-इराणमधील तणाव वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे."इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खोमेनी यांना मी एक स्पष्ट संदेश देऊ इच्छितो. जर तुम्ही इस्रायलला सातत्याने धमकावत राहिलात तर आमचा हात खूप लांब आहे. मग आमचा लांब हात पुन्हा एकदा इराणपर्यंत पोहोचेल. ते देखील आणखी मोठ्या ताकदीने, मग यावेळी तो तुमच्यापर्यंत वैयक्तिकरित्या पोहोचेल आणि यामध्ये तुमचं वैयक्तिक नुकसान होईल", अशा स्पष्ट शब्दांत इस्रायल काट्झ यांनी अयातुल्ला अली खोमेनी यांना इशारा दिला आहे. या संदर्भातील वृत्त टाईम्स ऑफ इंडियाने दिलं आहे.इस्रायल-इराण यांच्यातील संघर्षाविळी इस्रायलच्या हल्ल्यात इराणच्या अणू संशोधन मोहिमेचं मोठं नुकसान झालं होतं.इस्रायली अधिकाऱ्यांनी सांगितलं होतं की "आम्ही आमच्या मोहिमेच्या २४ तास आधी इस्फहानवर हल्ला केला. तर, रात्री मुख्य कारवाई पार पाडली. ज्यामुळे आमच्या या मोहीमेची व्यापकता वाढली". इस्रायली लष्कराने इराणमधील अनेक लष्करी व आण्विक तळांवर हल्ले केले होते. या वारंवार होत असलेल्या हल्ल्यांमुळे इराणच्या सेंट्रीफ्यूज उत्पादन क्षमतेवर मोठा परिणाम झाला होता.इस्रायल-इराण यांच्यातील संघर्षाविळी अमेरिकेनेही इस्रायल-इराण संघर्षात उडी घेत अमेरिकेच्या वायूदलाने इराणमध्ये हवाई हल्ले करून फोर्डो, नतान्झ व इस्फहानमधील तीन अणू प्रकल्पांना लक्ष्य केलं होतं. तसेच डोनाल्ड ट्रम्प यांनी स्वतः माहिती देताना सांगितलं होतं की, "आम्ही इराणधील फोर्डो, नतान्झ व इस्फहान मधील अणू प्रकल्पांवर यशस्वी हल्ले केले आहेत. एअर स्ट्राइक करून सर्व लढाऊ विमाने इराणच्या हवाई हद्दीबाहेर आली आहेत. यावेळी फोर्डो येथील अणू प्रकल्पाचं सर्वाधिक नुकसान झालं आहे".असं असतानाच आता इस्रायल- इराणबाबत महत्वाची माहिती समोर आली आहे. इस्रायलचे संरक्षण मंत्री इस्रायल काट्झ यांनी इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खोमेनी यांना रविवारी मोठा इशारा दिला आहे. 'जर अयातुल्ला अली खोमेनी ज्यू राष्ट्राला धमकावत राहिले तर त्यांचं वैयक्तिक नुकसान होईल', असं इस्रायल काट्झ यांनी म्हटलं आहे. त्यांच्या या इशाऱ्यामुळे पुन्हा इस्रायल-इराणमधील तणाव वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहेजर तुम्ही इस्रायलला सातत्याने धमकावत राहिलात तर आमचा हात खूप लांब आहे. मग आमचा लांब हात पुन्हा एकदा इराणपर्यंत पोहोचेल.

### उत्पादन क्षमतेवर मोठा परिणाम

मग यावेळी तो तुमच्यापर्यंत वैयक्तिकरित्या पोहोचेल आणि यामध्ये तुमचं वैयक्तिक नुकसान होईल", अशा स्पष्ट शब्दांत इस्रायल काट्झ यांनी अयातुल्ला अली खोमेनी यांना इशारा दिला आहे. या संदर्भातील वृत्त टाईम्स ऑफ इंडियाने दिलं आहे.इस्रायल-इराण यांच्यातील संघर्षाविळी इस्रायलच्या हल्ल्यात इराणच्या अणू संशोधन मोहिमेचं मोठं नुकसान झालं होतं. इस्रायली अधिकाऱ्यांनी सांगितलं होतं की "आम्ही आमच्या मोहिमेच्या २४ तास आधी इस्फहानवर हल्ला केला. तर, रात्री मुख्य कारवाई पार पाडली. ज्यामुळे आमच्या या मोहीमेची व्यापकता वाढली". इस्रायली लष्कराने इराणमधील अनेक लष्करी व आण्विक तळांवर हल्ले केले होते. या वारंवार होत असलेल्या हल्ल्यांमुळे इराणच्या सेंट्रीफ्यूज उत्पादन क्षमतेवर मोठा परिणाम झाला होता.

# आग्रा धर्मांतराचा पाकिस्तान संबंध!

## ऑनलाइन गेमिंगच्या माध्यमातून हिंदू मुलींचे ब्रेनवॉश

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**उत्तर प्रदेशच्या आग्रा पोलिसांनी शनिवारी एका धर्मांतराच्या रॅकेटचा शोध लावला. आंतरराष्ट्रीय संबंध असलेल्या या रॅकेटद्वारे भारतातील मुलींचे धर्म परिवर्तन केले जात होते. तसेच या मुलींचा संपर्क पाकिस्तानमधील काही लोकांशी करून दिला जात होता. तपासकर्त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, सोशल मीडिया, ऑनलाइन गेम्स, एन्क्रिप्टेड कम्युनिकेशन्स प्लॅटफॉर्म आणि डार्क वेबद्वारे रॅकेटचे काम चालू होते. हिंदुस्तान टाइम्सने सदरची बातमी दिली आहे.**



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पाकिस्तानमधील काही लोक भारतातील मुलींचे धर्मांतर करण्यासाठी त्यांच्याशी इस्लामवर चर्चा करत असत. इस्लामवर श्रद्धा निर्माण व्हावी, असा त्यांचा प्रयत्न असे.

यामध्ये काही काश्मिरी महिलांचाही समावेश असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. या महिला हिंदू धर्मातील काही बाबींवर टीका करून त्याविषयी मुलींच्या मनात नकारात्मक भावना निर्माण करत आणि त्यानंतर इस्लामचे महत्त्व समजावून सांगत असत.आग्रा पोलीस आयुक्त दीपक कुमार यांनी माझ्यमांशी बोलताना सांगितले,"आम्ही या प्रकरणात १४ जणांची अटक केली आहे.

तसेच ज्या मुलींची सुटका करण्यात आली, त्यांच्याशीही चर्चा केली. मुलींशी बोलल्यानंतर त्यांनी पाकिस्तानमधील लोकांशी संवाद साधल्याचे सांगितले.तसेच काश्मीर मधील काही महिलाही या मुलींवर प्रभाव टाकत होत्या.


"पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तनवीर अहमद आणि साहील अदीम हे दोन पाकिस्तानी नागरिक सोशल मीडियाद्वारे पीडित मुलींच्या संपर्कात होते, अशी माहिती समोर आली आहे. या रॅकेटद्वारे ऑनलाइन गेमिंगमधून मुलींना लक्ष्य केले जात असे.अशी माहिती एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली असल्याचे हिंदुस्तान टाइम्सने वृत्तात सांगितले.

### इस्लामचे महत्त्व समजावून सांगत

या प्रकरणात २१ वर्षीय पीडित मुलीने समोर येऊन साक्ष दिली आहे. या मुलीची उत्तराखंडमधून सुटका करण्यात आली होती. आग्र्यातील न्यायदंडाधिकाऱ्यांसमोर भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम १८३ द्वारे जबाब नोंदविण्यात आला आहे.पोलिसांनी सांगितले की, देहरादून, बरेली, अलीगड, झज्जर आणि रोहतोक येथून अनेक पीडित मुलींची सुटका करण्यात आली आहे., पाकिस्तानमधील काही लोक भारतातील मुलींचे धर्मांतर करण्यासाठी त्यांच्याशी इस्लामवर चर्चा करत असत. इस्लामवर श्रद्धा निर्माण व्हावी, असा त्यांचा प्रयत्न असे. यामध्ये काही काश्मिरी महिलांचाही समावेश असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. या महिला हिंदू धर्मातील काही बाबींवर टीका करून त्याविषयी मुलींच्या मनात नकारात्मक भावना निर्माण करत आणि त्यानंतर इस्लामचे महत्त्व समजावून सांगत असत.

# संजय कपूरच्या ३० हजार कोटी रुपयांच्या संपत्तीसाठी वाद

बॉलिवूडची अभिनेत्री करिश्मा कपूरचे माजी पती आणि प्रसिद्ध उद्योगपती संजय कपूर यांचे १२ जून २०२५ रोजी निधन झाले. लंडनमध्ये पोलो खेळत असताना त्यांना हृदयविकाराचा झटका आला. १९ जून रोजी दिल्लीच्या लोधी मार्ग येथे त्यांच्यावर कुटुंबियांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले. संजय कपूर यांच्या मृत्यूनंतर आता त्यांच्या संपत्तीबद्दल वाद निर्माण झाला आहे. संजय कपूर यांचे ३० हजार कोटी रुपयांचे उद्योगविश्व कोण सांभाळणार? यावरून कुटुंबात कलह पाहायला मिळत आहे. त्यातच आता अभिनेत्री करिश्मा कपूरनेही हिस्सा मागितला आहे.माध्यमात आलेल्या बातम्यांनुसार संजय कपूर यांच्या मातोश्री रानी कपूर यांच्या पत्रामुळे वादळ उठले आहे. संजय कपूर यांच्या सोना कॉमस्टार या कंपनीची वार्षिक सर्वसाधारण सभेआधी रानी कपूर यांनी पत्र लिहून सोना समूहाच्या त्या सर्वात मोठ्या भागधारक असल्याचे म्हटले आहे.रानी कपूर यांनी पुढे म्हटले की, काही व्यक्ती कुटुंबाचा वारसा सांगण्याचा प्रयत्न करत आहेत. तसेच




कुटुंबाचा प्रतिनिधी म्हणून त्यांनी कुणाचीही नियुक्ती केलेली नाही. दैनिक जागरणच्या वृत्तानुसार, संजय कपूर यांची द्वीतीय पत्नी असलेल्या करिश्मा कपूर यांनीही आता संपत्तीमध्ये हिस्सा मागितला आहे. तथापि या वृत्ताला करिश्मा कपूर किंवा त्यांच्यावतीने कुणीही दुजोरा दिलेला नाही.रानी कपूर यांनी मुलगा संजय कपूरच्या मृत्यूबद्दलही संशय व्यक्त केला होता. ज्या परिस्थितीत संजय कपूर यांचा मृत्यू झाला, ती संशयास्पद परिस्थिती असल्याचा आरोप त्यांनी यापूर्वी केला होता. रानी कपूर यांचे वकील वैभव गग्गर यांनी एएनआयशी बोलताना सांगितले, "माझ्या अशील म्हणजेच संजय कपूर यांच्या आईसाठी मुलाचा मृत्यू धक्कादायक होता. मृत्यूसंदर्भात जे सांगितले जात आहे, ती परिस्थिती त्यांना मान्य नाही. सत्य समोर येईपर्यंत त्या गप्प बसणार नाहीत." एनडीटीव्हीच्या वृत्तानुसार रानी कपूर यांनीही असाही दावा केला होता की, मुलाच्या मृत्यूनंतर काही कागदपत्रांवर त्यांना स्वाक्षरी करण्यास भाग पाडले गेले. त्यामुळेच सोना ग्रुपची होणारी वार्षिक सर्वसाधारण सभा रद्द करण्यात यावी, अशी विनंती त्यांनी केली होती. नवीन संचालकांच्या नियुक्तीलाही त्यांनी विरोध दर्शविला.२०१५ साली संजय कपूरचे वडील सुरिंदर कपूर यांच्या निधनानंतर सोना कॉमस्टर या कंपनीची धुरा त्यांच्या हातात आली.

## पलक तिवारीच्या पैशांचं नियोजन

छोट्या पडद्यावर एकापेक्षा एक भूमिका साकारत अभिनेत्री श्वेता तिवारीने प्रेक्षकांच्या मनावर राज्य केले. 'कसौटी जिंदगी की' ही तिची मालिका लोकप्रिय ठरली होती. तिला या मालिकेतून मोठी प्रसिद्धी मिळाली. अभिनेत्री तिच्या व्यावसायिक आयुष्याबरोबरच खासगी आयुष्यामुळे, तसेच तिच्या वक्तव्यांमुळेदेखील मोठ्या चर्चेत असते. नुकतीच अभिनेत्रीने भारती टीव्ही या यूट्यूब चॅनेलला मुलाखत दिली. या मुलाखतीत तिने पालकत्व, शिस्त, मुलांचे करिअर तसेच त्यांच्या पैशांची गुंतवणूक याबद्दल वक्तव्य केले.मुलीला एकटीने वाढवताना तिने कोणती काळजी घेतली, तिला कोणत्या अडचणींचा सामना करावा लागला का, याबद्दल अभिनेत्री म्हणाली, "मी फार कडक शिस्तीत मुलांना वाढवले नाही, पण घरात काही नियम होते. जर पलकने मला सांगितले की ती पार्टीमधून रात्री एक वाजता घरी पोहोचणार आहे.

## ग्रुपिझममुळे काम मिळत नाही

इंडस्ट्रीमध्ये ग्रुपिझम आहे असं अनेक कलाकार वारंवार म्हणताना दिसतात. प्रत्येक दिग्दर्शकाचा, निर्मात्याचा एक वेगळा ग्रुप असतो, ज्यामध्ये ठराविक कलाकार दिसतात असं अनेकदा कलाकारांनी मुलाखतींमधून सांगितलं आहे. अशातच आता अभिनेत्री भार्गवी चिरमुले हिनेसुद्धा यावर तिचं मत मांडलं आहे. भार्गवी चिरमुलेने 'राजश्री मराठी'ला मुलाखत दिली आहे. यामध्ये तिला इंडस्ट्रीमधील ग्रुपिझमबद्दल विचारण्यात आलेलं. यावर भार्गवी म्हणाली, "ग्रुपिझम आहे. शंभर टक्के आहे. तो ग्रुप तोडणं खूप कठीण आहे. ते त्यांच्या त्यांच्या कंफर्टझोनमध्ये काम करत आहेत. ते चूक आहे की बरोबर यात मला पडायचं नाहीये, पण आपण त्यांच्यापर्यंत पोहचणं फार कठीण झालं आहे. चित्रपट पाहिल्यानंतर त्यातून ग्रुपिझम आहे हे कळून येतं. ते त्यांचे त्यांचे लोक घेतात आणि त्या कंफर्टझोनमधून ते बाहेरच येत नाहीत."भार्गवी पुढे म्हणाली, "त्यामुळे ते वेगळ्या कलाकारांना संधीच देत नाही. आपल्याला ते भेटतात आणि म्हणतात की आपण एकत्र काम करूयात, पण तसं कधीच होत नाही. त्यांच्या चित्रपटाच्या प्रीमियरला आपण जातो, त्यांच्या पार्टीमध्ये आपण असतो, त्यांच्या यशामध्ये आपण असतो, पण तरी त्यांच्या चित्रपटात मात्र आपण कधीच दिसत नाही आणि याचं वाईट वाटलं. एक कलाकार म्हणून वाईट वाटणारच. आम्हालाही तुमच्याबरोबर काम करायचं आहे. तुम्ही एवढे मोठे आहात, तुमच्याकडून शिकायचं आहे, पण ते होतच नाही.""सगळ्यांचे आपले आपले ग्रुप आहेत.



## सूरज पांचोलीमुळे जिया खानची आत्महत्या

अभिनेत्री सोमी अलीने आदित्य पांचोली आणि त्याचा मुलगा सूरज यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. सोमी अलीने एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये तिने सूरज पांचोली आणि आदित्य पांचोली या दोघांवरही आरोप केले आहेत. जिया खान या अभिनेत्रीने सूरज पांचोलीमुळेच आत्महत्या केल्याचाही आरोप सोमी अलीने केला आहे.आदित्य पांचोली हा माणूस अत्यंत विचित्र आहे, तसंच तो अतिशय घृणा वाटेल असा माणूस आहे. तो कायमच महिलांना मारहाण करतो, शिवीगाळ करतो.आदित्य पांचोलीचा मुलगा सूरज हा अभिनेत्री जिया खानच्या आत्महत्येसाठी जबाबदार आहे. २०१३ मध्ये जियाने याच्यामुळेच आत्महत्या केली. आदित्य पांचोली महिलांची फसवणूक करतो, त्यांचा विश्वासघात करतो. त्यांनी आवाज उठवला की त्यांना मारहाण करतो असाही आरोप सोमी अलीने केला आहे.२०१३ मध्ये अभिनेत्री जिया खानचा मृत्यू झाला. तिचा मृतदेह तिच्या मुंबईतल्या घरात आढळला होता. त्यावेळी या प्रकरणात सूरज पांचोली हा आरोपी ठरला होता. सूरज पांचोलीने जिया खानला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याचा आरोप त्याच्या वर होता. या प्रकरणाची माध्यमांमध्ये बरीच चर्चा झाली होती. २८ एप्रिल २०२३ ला सीबीआयच्या विशेष न्यायालयाने सूरज पांचोलीची या गुन्ह्यातून मुक्तता केली. या प्रकरणानंतर तीन वर्षांनी सोमी अलीने हे आरोप केले आहेत.



## रिंकू राजगुरु सिंगल की कमिटेड? स्वत:च केला खुलासा

अभिनेत्री रिंकू राजगुरु मराठी इंडस्ट्रीतील लोकप्रिय अभिनेत्री आहे. आजवर तिने विविध चित्रपटांमध्ये काम करत तिच्या अभिनयाने प्रेक्षकांचं मनोरंजन केलं आहे. ती सोशल मीडियावरही सक्रिय असते. अभिनेत्रीचा सोशल मीडियावर मोठा चाहतावर्ग आहे. अशातच तिला एका चाहत्याने ती सिंगल आहे की रिलेशनशिपमध्ये याबाबत विचारलं आहे. रिंकू राजगुरु सोशल मीडियावर अनेकदा तिचे फोटो, व्हिडीओ पोस्ट करत असते. यासह ती तिच्या कामाच्या अपडेटदेखील यामार्फत चाहत्यांसह शेअर करत असते. अशातच तिने नुकतंच 'आस्क मी' हे सेशन घेतलं होतं. यावर अनेकांनी तिला विविध प्रश्न विचारले. रिंकूने त्या सर्वांची उत्तरं दिल्याचं पाहायला मिळालं. परंतु, यादरम्यान तिला एका चाहत्याने चक्क तू सिंगल आहेस का असा प्रश्न विचारला.रिंकूने चाहत्याने विचारलेल्या प्रश्नाचं उत्तर देत ती रिलेशनशिपमध्ये आहे की नाही याबाबत सांगितलं आहे. रिंकूने सोशल मीडियावर याचं उत्तर देत हो असं म्हटलं आहे. यामार्फत तिने ती कोणालाही डेट करत नसून सिंगल असल्याचं स्पष्ट केलं आहे.यासह एका चाहत्याने यादरम्यानच तिला "तुझा प्रेमावर विश्वास आहे का?", असा प्रश्न विचारला होता. यावर तिने हो असं म्हटलं आहे. त्यामुळे ती सध्या सिंगल जरी असली तरी तिचा प्रेमावर विश्वास असल्याचं तिने यातून म्हटलं आहे. रिंकूने नुकताच सोशल मीडियावर एक फोटो पोस्ट केला होता, ज्यामुळे ती डेटवर गेली आहे अशा चर्चा सुरू होत्या; परंतु तिने ती कोणाहीबरोबर डेटवर गेली नसून सोलो डेटला गेल्याचं म्हटलं आहे. रिंकूने यामधून तिच्या काही आवडत्या गोष्टींबद्दलही सांगितलं आहे. या सेशनमधून तिने तिचा आवडता चित्रपट, पदार्थ, आगामी चित्रपट याबद्दल सांगितलं आहे. रिंकूने यामधून 'पिंजरा' हा तिचा आवडता चित्रपट असल्याचं सांगितलं आहे. यासह तिला मोदक हा पदार्थही खूप आवडतो.

# अष्टपैलू रविंद्र जडेजाचा दुर्मिळ विक्रम

## इंग्लंडच्या भूमीवर कामगिरी करणारा आशियातील एकमेव खेळाडू

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारत आणि इंग्लंड यांच्यातील मँचेस्टर कसोटीच्या शेवटच्या दिवशी भारतीय संघाकडून उत्कृष्ट फलंदाजीचं प्रदर्शन पाहायला मिळालं. दिवसाच्या सुरुवातीला केएल राहुल आणि शुबमन गिल यांनी संघाला दमदार सुरुवात करून दिली. त्यानंतर वॉशिंग्टन सुंदर आणि रवींद्र जडेजा यांनी संघाचा डाव सावरत इंग्लंडच्या गोलंदाजांना जेरीस आणलं. यादरम्यान रवींद्र जडेजाने एक मोठा दुर्मिळ विक्रम आपल्या नावे केला आहे.**




### जडेजाने 5 अर्धशतकं झळकावली

पण भारतीय खेळाडू काही थांबले नाहीत. जडेजा आणि वॉशिंग्टनने इंग्लंडच्या गोलंदाजांना पळवून पळवून मारलं. दोघांनी आपलं शतक पूर्ण केलं. ज्यावेळी रवींद्र जडेजाने आपलं शतक पूर्ण केलं त्यावेळी हॅरी ब्रुक हात मिळवण्यासाठी पुढे आला होता. पण त्याने मागे वळून पाहिलं नाही. जडेजाचं शतक पूर्ण झाल्यानंतर वॉशिंग्टन सुंदरने आपलं शतक पूर्ण केलं. मग गिलने सामना थांबवण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे सामना ड्रॉ राहिला.रवींद्र जडेजा इंग्लंडविरूद्ध मालिकेत बॅटने भारतासाठी तारणहार ठरला. जडेजाने ४ सामन्यांमध्ये ५ अर्धशतकं झळकावली आहेत. जडेजाने चौथ्या कसोटीत ४ विकेट्स घेतले आहेत. यानंतर फलंदाजीला आल्यानंतर जडेजाने झटपट अर्धशतक झळकावलं आणि सुंदरला चांगली साथ देत दोघांनी शतकी भागीदारी रचली आणि इंग्लंडच्या मँचेस्टर कसोटी विजयाच्या आशा संपुष्टात आणल्या.रवींद्र जडेजाने फलंदाजी करत इतिहास घडवला आहे. चालू मालिकेत जडेजाने ५ अर्धशतकं झळकावली आहेत.

रवींद्र जडेजा इंग्लंडविरूद्ध मालिकेत बॅटने भारतासाठी तारणहार ठरला. जडेजाने ४ सामन्यांमध्ये ५ अर्धशतकं झळकावली आहेत. जडेजाने चौथ्या कसोटीत ४ विकेट्स घेतले आहेत. यानंतर फलंदाजीला आल्यानंतर जडेजाने झटपट अर्धशतक झळकावलं आणि सुंदरला चांगली साथ देत दोघांनी शतकी भागीदारी रचली आणि इंग्लंडच्या मँचेस्टर कसोटी विजयाच्या आशा संपुष्टात आणल्या.रवींद्र जडेजाने फलंदाजी करत इतिहास घडवला आहे. चालू मालिकेत जडेजाने ५ अर्धशतकं झळकावली आहेत. यासह त्याने इंग्लंडच्या भूमीवर कसोटी क्रिकेटमध्ये १ हजार धावा पूर्ण केल्या आहेत. यासह रवींद्र जडेजा हा इंग्लंडच्या भूमीवर १ हजार धावा आणि ३० अधिक विकेट घेणारा पहिला भारतीय खेळाडू ठरला आहे.आशियातील ७ फलंदाजांनी इंग्लंडच्या भूमीवर १००० पेक्षा जास्त धावा केल्या आहेत. १८ गोलंदाजांनी ३०+ विकेट घेतले आहेत, परंतु अष्टपैलू जडेजा हा एकमेव खेळाडू आहे ज्याने एकाचवेळी हे दोन्ही विक्रम आपल्या नावे केले आहेत. याशिवाय इंग्लंडमध्ये ६ ते ११ व्या क्रमांकावर फलंदाजी करताना १ हजारपेक्षा जास्त धावा करणारा जडेजा गॅरी सोबर्स यांच्यानंतरचा पहिला खेळाडू आहे.कसोटी मालिकेत सहाव्या किंवा त्याखालील क्रमांकावर फलंदाजी करणाऱ्या खेळाडूने सर्वाधिक अर्धशतकं करण्याचा विक्रम महान सर गॅरी सोबर्स यांच्या नावावर होता. गॅरी सोबर्स यांनी ५ अर्धशतकं झळकावली होती. आता रवींद्र जडेजानेही त्याची बरोबरी केली आहे. जर जडेजाने शेवटच्या कसोटी सामन्यातही अर्धशतक झळकावले तर तो या यादीत अव्वल स्थानावर असेल. व्हीव्हीएस लक्ष्मणने २००२ मध्ये भारतासाठी एका मालिकेत ५ अर्धशतकं झळकावली होती. या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करताना भारतीय संघाला ३५८ धावा करता आल्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना इंग्लंडने ६६९ धावा केल्या. त्यामुळे इंग्लंडने पहिल्या डावात मोठी आघाडी घेतली. त्यामुळे भारतीय संघाला सामना वाचवायचा असेल तर पूर्ण पाचवा दिवस खेळून काढायचा होता. या डावाच्या सुरुवातीलाच ख्रिस वोक्सने भारतीय संघाला २ मोठे धक्के दिले. आधी यशस्वी जैस्वाल आणि पुढच्याच चेंडूवर साई सुदर्शनला बाद करत माघारी धाडलं. त्यानंतर केएल राहुल आणि शुबमन गिलने मिळून भारतीय संघाचा डाव सांभाळला. गिल आणि राहुलने मिळून १८८ धावांची दमदार भागीदारी केली. या भागीदारीमुळे भारतीय संघ हा सामना गमावणार नाही, हे तर स्पष्ट झालं. केएल राहुलला शतक झळकावण्याची संधी होती. पण त्याचं शतक थोडक्यात हुकलं. तो बेन स्टोक्सच्या गोलंदाजीवर ९० धावा करत माघारी परतला. त्यामुळे त्याचं शतक अवघ्या १० धावांनी हुकलं. त्यानंतर कर्णधार गिलने आपलं शतक पूर्ण केलं. गिल आणि राहुलने पाया रचल्यानंतर, रवींद्र जडेजा आणि वॉशिंग्टन सुंदरने मिळून भारतीय संघाला वाचवलं.या जोडीने मिळून १०० हून अधिक धावांची भागीदारी केली. इंग्लंडचे खेळाडू हात जोडून सामना थांबवण्यासाठी विनंती करत होते.

# कोणालाच नाही जमलं गिलने करून दाखवलं!

## मँचेस्टरमध्ये अशी कामगिरी करणारा ठरला पहिलाच भारतीय

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारताचा नवा कर्णधार शुबमन गिलची बॅट इंग्लंडविरूद्ध चांगलीच तळपताना दिसत आहे. गिलने इंग्लंडविरूद्ध आतापर्यंत ४ शतकं झळकावली आहेत आणि अनेक दिग्गज खेळाडूंचे विक्रम मोडले आहेत. इंग्लंडविरूद्धच्या चौथ्या कसोटी सामन्याच्या दुसऱ्या डावात शुबमन गिलने शतक झळकावलंय. यासह तो या मैदानावर शतक करणारा ९वा भारतीय खेळाडू आहे.**




### सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम

सामना काही काळ थांबला पण गिलने हार मानली नाही आणि नंतर त्याचे शतक पूर्ण केले. गिलने त्याच्या शतकी खेळीदरम्यान स्वतःवर खूप नियंत्रण ठेवत शानदार फटके खेळले.गिल हा मँचेस्टरमध्ये सचिन तेंडुलकरनंतर ३५ वर्षांत शतक करणारा पहिला फलंदाज ठरला आहे. सचिन तेंडुलकरने १९९० मध्ये या मैदानावर शतक झळकावलं होतं. त्यानंतर गेल्या ३५ वर्षांत कोणताच फलंदाज ही कामगिरी करू शकला नाही. आता गिलने ही कामगिरी केली आहे. यापूर्वी १९९० मध्ये मोहम्मद अझरुद्दीनने कर्णधार म्हणून याच मैदानावर शतक झळकावलं होतं.शुबमन गिलने इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेत सर्वाधिक धावा करण्याचा विक्रमही केला. त्याच्या आधी यशस्वी जैस्वालने २०२४ मध्ये इंग्लंडविरुद्धच्या मालिकेत ७१२ धावा केल्या होत्या. गिलने आता त्याला मागे टाकलं आहे.एकाच कसोटी मालिकेत ४ शतकं करणारा गिल सुनील गावस्कर आणि डॉन ब्रॅडमन यांच्यानंतर तिसरा कर्णधार बनला आहे.

२५ वर्षीय शुबमन गिलने २२८ चेंडूत १२ चौकारांसह आपलं शतक पूर्ण केलं.इंग्लंडने भारतीय संघावर ३११ धावांची आघाडी घेतली होती. भारताची सुरुवात खातं न उघडता २ विकेट अशी झाली होती. यानंतर गिल आणि राहुलने संघाचा डाव सावरला आणि दोघांनी चांगली भागीदारी रचली. पण पाचव्या दिवशी बेन स्टोक्सने राहुलला बाद करत ही भागीदारी तोडली.राहुल बाद झाल्यानंतर गिलने सुंदरच्या मदतीने संघाचा डाव सांभाळला आणि शतक झळकावलं. गिल शतकाकडे वाटचाल करत होता पण यादरम्यान स्टोक्सचा उसळता चेंडू त्याच्या हाताला आणि हेल्मेटला लागल्याने कळवळताना दिसला.

स्मार्ट PCMC
SMART CITY
महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। सोमवार।
। दि. 28 जुलै 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती




Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046